**ठळक बातम्या**

- भारत-इंडोनेशिया संबंध दृढतर झाल्यानं आग्नेय आशिया आणि जागतिक शांतता तसंच स्थैर्याला बळकटी येईल, असं प्रधामनंत्र्यांचं प्रतिपादन

- राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर अमेरिकेसोबत कोणत्याही अंतिम करारावर चर्चा करायला इराणचा स्पष्ट नकार

- नर्मदा नदीवर सरदार सरोवर धरण बांधल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व समस्या दूर झाल्या असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही

- अयोध्येतल्या श्रीराम मंदिराच्या दानपेटीतल्या कथित भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेसचं 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' हे राज्यव्यापी आंदोलन सुरु

**आणि**

- अहमदाबाद इथं २००८मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातल्या ३८ दोषींना फाशी, आणि इतर ११ जणांना जन्मठेप देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयात कायम

**<><><><><>**

भारत-इंडोनेशिया संबंध दृढतर झाल्यानं दोन्ही  देशांबरोबरच आग्नेय आशिया आणि जागतिक शांततेला तसंच  स्थैर्याला बळकटी येईल असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. इंडोनेशिया दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी आज मोदी यांचं इंडोनेशियन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत भाषण झालं. यावेळी ते म्हणाले...

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

विकास, शांती, स्थैर्य आणि समृद्धी ही भारतानं जपलेली मूल्य असल्याचं सांगून त्यांनी दहशतवादाविरुद्ध एकजुटीनं कारवाई करण्याची गरज अधोरेखित

केली. संरक्षण, शिक्षण, सागरी व्यापाराची सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा विविध क्षेत्रात दोन्ही देशात आज महत्त्वाचे करार झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. व्यक्तिगत पातळीवर दोन्ही देशांमधे समान सांस्कृतिक धागे असून, पायाभूत सुविधा, शिक्षण अशा विविध क्षेत्रात परस्पर सहकार्याला मोठा वाव असल्याचं त्यांनी सांगितलं. अवकाश आणि उपग्रह क्षेत्रात भारत इंडोनेशियाला सहकार्य करायला तयार आहे असं ते म्हणाले.

इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रोबोवो सुबियंतो यांच्याशी आज मोदी यांची द्विपक्षीय चर्चा झाली. इंडोनेशियातला सर्वोच्च नागरी सन्मान बिनतांग आदिपूर्णा आज मोदी यांना प्रदान करण्यात आला. मोदी यांना मिळालेला हा ३५वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर इराणनं अमेरिकेसोबत कोणत्याही अंतिम करारावर चर्चा करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये अमेरिका आणि इराणमधल्या जुन्या कराराची आठवण करून दिली आहे. अमेरिका जोपर्यंत जुन्या जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवत दिलेले शब्द पाळत नाही, तोपर्यंत इराण कोणतीही नवीन चर्चा सुरू करणार नाही, असं अराघची यांनी सांगितलं. अमेरिका इराणसोबत एकतर नवा करार करेल किंवा विषय कायमचा संपवून टाकेल, असं ट्रम्प म्हणाले होते. गरज पडल्यास अमेरिका इराणच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा पूर्णपणे उद्ध्वस्त करू शकते, असा दावाही ट्रम्प यांनी केला होता.

**<><><><><>**

नर्मदा नदीवर सरदार सरोवर धरण बांधल्यानंतर निर्माण झालेल्या सर्व समस्या दूर झाल्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. यासंदर्भात

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्त्वाखाली नवी दिल्लीत ४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. यापूर्वी राज्याकडे २-३ हजार कोटी रुपयांच्या थकीत रकमेची मागणी केली जात होती. आता राज्याला केवळ २७ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. तसंच राज्याला १० टीएमसी पाणी मिळणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><>**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर मिसिंग लिंकमध्ये निर्माण झालेल्या समस्येची कारणं सरकार शोधत आहे. ही कारणं सभागृहात मांडली जातील असं निवेदन मंत्री शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिलं. हे सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. देहू आणि आळंदीहून निघणाऱ्या पालख्यांमधल्या वारकऱ्यांना पावसात सरकार काही मदत करणार का यासंदर्भात निवेदन करण्याचे निर्देश सभापती राम शिंदे यांनी सरकारला दिले.

कर्नाटकसारख्या राज्यात जात पडताळणी करणं गरजेचं नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुधारणा करता येईल का याचा विचार करावा, त्यासाठी ॲडव्होकेट जनरलच्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयात सुधारित अर्ज दाखल करावा अशी मागणी सदस्य प्रसाद लाड यांनी केली. त्यावर कायदेशीर बाबी तपासून घेऊ असं आश्वासन मंत्री माधुरी मिसाळ यांनी सदनात दिलं.

महिला शेतकरी विधेयक कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधान परिषदेत मांडलं.

**<><><><>**

राज्यात सध्या सुमारे चार ते साडे चार लाख बेकायदा बाईक टॅक्सी रस्त्यावर धावत असून आरटीओ वेळोवेळी त्यांच्यावर कारवाई करत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यात फक्त इलेक्ट्रिक बाईक्सना परवानगी देण्यात आली होती, पण पेट्रोल बाईक्स सर्रास रस्त्यावर उतरल्या,

त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालायचा निर्णय सरकारने घेतला. पण देशभर सगळीकडे एकाच ॲपद्वारे या कंपन्या काम करत असल्यामुळे ही बंदी मागे घ्यावी लागली, असं ते म्हणाले. येत्या १ ऑगस्टपासून अशा सर्वच प्रकारच्या वाहनांचा परवाना मिळवताना अधिवासाचं प्रमाणपत्र सक्तीचं केलं जाणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं. सरकारनं आत्तापर्यंत सभागृहात दिलेली आश्वासनं आणि अधिक माहिती पटलावर ठेवण्याच्या परिस्थितीबाबतची श्वेतपत्रिका हे अधिवेशन संपेपर्यंत काढावी, असा आदेश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले.

**<><><><><>**

अयोध्येतल्या श्रीराम मंदिराच्या दानपेटीतल्या कथित अपहार आणि भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेसनं 'रघुपती राघव राजाराम सत्याग्रह' या राज्यव्यापी आंदोलनाची सुरुवात आज नाशिकच्या काळाराम मंदिरापासून केली. कार्यकर्त्यांनी 'रघुपती राघव राजाराम' हे भजन सामूहिकपणे गात आंदोलनाचा प्रारंभ केला. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी याप्रकरणी भाजपा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राम मंदिर ट्रस्टच्या विश्वस्तांवर टीका केली.

**<><><><><>**

अहमदाबाद इथं २००८मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातल्या ३८ दोषींना फाशी, आणि इतर ११ जणांना जन्मठेप देण्याचा विशेष न्यायालयाचा निर्णय गुजरात उच्च न्यायालयानं कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती ए. वाय. कोगजे आणि न्यायमूर्ती समीर दवे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणी विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरोधातले सर्व दावे उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. २६ जुलै २००८ रोजी अहमदाबादमध्ये ७० मिनिटांत २१ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. त्यात ५६ जणांचा मृत्यू झाला होता तर २०० जण जखमी झाले होते. या घातपातात इंडियन मुजाहिद्दीन या

दहशतवादी संघटनेच्या ३८ सदस्यांना २०२२मध्ये विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा तर इतर ११ दोषींना जन्मठेप सुनावली होती.

<><><><>

'ज्ञानोबा-तुकोबा'च्या अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीनं आषाढी वारीसाठी आज देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान केलं. सायंकाळी पालखीची नगरप्रदक्षिणा झाल्यानंतर पहिल्या मुक्कामासाठी ती देहूतल्या इनामदार वाड्यात दाखल होणार आहे. उद्या सकाळी पालखी पुढच्या प्रवासासाठी पिंपरी-चिंचवडकडे मार्गस्थ होईल.

<><><><>

वारकऱ्यांनी वार्षिक पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी आळंदीत येणं टाळावं, असं आवाहन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या विश्वस्तांनी केलं आहे. मुसळधार पावसामुळे राज्यात निर्माण झालेली गंभीर पूरपरिस्थिती लक्षात घेत त्यांनी हे आवाहन केलं.

<><><><>

फुटबॉलमध्ये लोकांना एकत्र आणण्याची ताकद असून भारताला या खेळात अव्वल स्थानी नेण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करावेत, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. नवी दिल्लीत 'ड्युरंड कप २०२६' या फुटबॉल स्पर्धेच्या ट्रॉफीच्या अनावरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. यंदा ड्युरंड कप, प्रेसिडेंट्स कप आणि शिमला ट्रॉफी जिंकण्यासाठी नवीन संघ नशीब आजमावणार आहेत, तसंच श्रीलंकेच्या संघाच्या सहभागामुळे या ऐतिहासिक स्पर्धेची लोकप्रियता आणखी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यंदा ही स्पर्धा कोलकाता, गुवाहाटी, इम्फाळ आणि शिलाँगसोबतच रांची इथंही होणार असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त

केला. या सोहळ्याला संरक्षण दल प्रमुख जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ आणि नौदलप्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन उपस्थित होते.

**<><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आज रात्री अटलांटा इथं होणाऱ्या बाद फेरीच्या सामन्यात गतविजेता अर्जेंटिना संघ इजिप्तशी दोन हात करेल. त्यानंतर व्हँकुव्हर इथं होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात स्वित्झर्लंडचा सामना कोलंबियाशी होईल. याआधी सिएटल इथं झालेल्या सामन्यात बेल्जियमनं अमेरिकेचा ४-१ असा मोठा पराभव करत दिमाखात उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. आता येत्या १० तारखेला लॉस एंजेलिस स्टेडियमवर होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात बेल्जियमची गाठ स्पेनशी पडेल. स्पेननं काल रात्री डॅलस स्टेडियमवर झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पोर्तुगालचा १-० असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. इंग्लंड, नॉर्वे, मोरोक्को आणि फ्रान्स या संघांनी यापूर्वीच उपांत्यपूर्व फेरीत आपली जागा निश्चित केली आहे.

**<><><><>**

मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून वातावरण ढगाळ आहे, परंतु पावसानं उसंत घेतल्यानं काल विस्कळीत झालेलं जनजीवन पूर्वपदावर आलं. रस्ते आणि रेल्वे वाहतूक सुरळीत होत आहे. गेल्या सहा दिवसात शहर आणि उपनगरात सुमारे अकराशे वृक्ष उन्मळून पडल्याची माहिती पालिकेच्या सूत्रांनी दिली. हवामान विभागानं आज पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

केंद्रीय अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत ७० लाख रोपं लावण्याच्या मोहिमेचा प्रारंभ केला. एक पेड माँ के नाम अभियान अंतर्गत दिल्ली शहराचं हरित आच्छादन वाढवण्याच्या उद्देशानं ही मोहीम राबवली जात आहे. दिल्लीतल्या

प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसंच  पर्यावरणात बदल घडवून आणण्यासाठी ही वृक्षारोपण मोहीम महत्त्वपूर्ण आहे, असं शहा यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाल दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता उपस्थित होत्या.

**//<><><><><>//**